नाव: स्वराली नितीन वाणी.
इयत्ता: १२ वी
शाळा: जे.सी. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा (लाड)
विषय: राणी लक्ष्मीबाई माझ्या स्वप्नात आल्या....

## स्वप्नी आली राणीलक्ष्मीबाई....

स्वप्नी येऊन वदते ती लक्ष्मी आई
कसले ग जीवन जगताय तुम्ही बाई....

स्वप्न मी पाहिले तुमच्या स्वातंत्र्याचे
पण गुलाम झालात तुम्ही पारतंत्र्याचे....

अत्याचार बलात्कार मी नव्हता चिंतला
बोलताना याविषयी तुमचा आवाज का बसला?....

स्वातंत्र्याची स्वप्ने मी जागेपणी पाहिली
लढता लढता प्राणालाही मी मुकली....

तरीही लढले त्या ब्रिटीश सरकारशी झुंजार
उतरविण्या डोक्यावरून पारतंत्र्याचे भार....

अवस्था तुमची पाहुनी आज अश्रु आले नयनी
प्रयत्न मी केले इतके तरी स्त्री का नाही सन्मानी?....

साधुसंत देवतांच्या या माझ्या पावन भूमीवर
अजूनही स्त्री का टांगली जाते टांगणीवर?....

आत्मनिर्भर बाई तुम्ही कधी ग होणार
स्वत:चे स्वातंत्र्य तुम्ही कधी ग मिळवणार....

मी तर त्या चिमुकल्याला पाठीवर घेऊन झुंजली
सुदैवाने तुम्हाला गरोदरपणाची सुट्टी सुद्धा लाभली....

शत्रूच्या छावणीस एकटी जाण्यास नाही मी घाबरली
तुम्ही तर स्वत: स्वत:ची नाकाबंदी करून घेतली....

लहान मुलांना का ग तुम्ही मजुरी करायला लावतात
पैशाच्या मागे तुम्ही सगळी इतकी का धावतात....

सैन्यामध्ये मी स्त्रियांची मुहूर्तमेढ रोवली
झाशी वाचवण्यास अंतिम श्वासापर्यंत लढली....

पण आज सगळीकडे पुन्हा ब्रिटिश सत्तेच सावट पसरतंय
का? महत्त्व क्रांतिकारी योद्धयांच इतिहासाच्या पानांवरून उतरतंय....